| वर्ष - 8 । अंक - 249 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™

गुढीपाडवा
मराठी नववर्ष निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा!

www.mahaenews.com | रविवार, दि. 30 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



वर्ष - 8 । अंक - 249 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज™

गुढीपाडवा
मराठी नववर्ष निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा!

www.mahaenews.com | रविवार, दि. 30 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## श्रीराम मंदीर झाले, 370 वे कलम हटले

# ‘समान नागरी कायदा’ येणारच!

## आता, भाजपाचे ‘टार्गेट’ आणि ‘रोडमॅप’ तयार




**कायद्याची सुरुवात उत्तराखंडमधून : मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी ठरले ‘हिंदुहृदयसम्राट’!**

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**भारतीय जनता पार्टीने पूर्वीपासून आपल्या जाहीरनाम्यात तीन महत्त्वाची आश्वासने दिली आहेत. अयोध्येत श्रीरामाचे भव्य मंदीर, जम्मू-काश्मीरमधील ३७० वे कलम हटवणे आणि देशात समान नागरी कायदा ! आता, या तीन पैकी दोन आश्वासने पूर्ण झाली असल्या कारणाने ‘समान नागरी कायदा’ लागू करण्याचा ‘रोड मॅप’ पूर्ण झाला आहे. लवकरच हा कायदा लागू होणार आहे !**

### मुस्लिम समाजाला मान्य असेल?

‘समान नागरी कायदा’ आणला गेल्यास देशातील मुस्लिम समाज तो मान्य करणार नाही आणि सगळीकडे दंगे होतील, अशी भीती अनेक राजकीय पक्ष वर्तवत आहेत. पण, अशीच भीती श्रीराम मंदिराच्या उभारणीच्या वेळी किंवा काश्मीरमधील ३७० वे कलम हटवण्याच्या वेळी वर्तवली गेली होती. केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने यावर कडक उपाययोजना आणि व्यवस्थित ‘रोड मॅप’ तयार केल्यामुळे दंगलीची भीती आता उरलीच नाही.

### उत्तराखंडचे मुख्यमंत्री ‘इन ॲक्शन मोड!’

मोदी सरकारने व्यवस्थित व्यूहरचना आखून या ‘समान नागरी कायद्या’ ची अंमलबजावणी सर्वात प्रथम उत्तराखंडमध्ये केली आणि व्यवस्थित चाचपणी केली. त्यानंतर मुस्लिम समाजामध्ये कसलाही रोष दिसला नाही. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी ‘ॲक्शन मोड’ मध्ये येऊन प्रथम ही अंमलबजावणी केली. थोडक्यात, या कायद्याची सर्व सूत्रे स्वीकारून आणि तो यशस्वीपणे अमलात आणून खऱ्या अर्थाने धामी हे ‘हिंदुहृदयसम्राट’ च बनले आहेत.

### ‘एक देश..एक विधान.. नवा हिंदुस्तान!’

धामी यांनी एका कार्यक्रमात ‘एक देश, एक विधान नवा हिंदुस्तान’ या विषयावर बोलताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं कौतुक केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत ‘एक देश, एक विधान, नवा हिंदुस्तान’ या व्हीजनवर वाटचाल करत आहे, असे धामी म्हणतात.

### समान नागरी कायदा केला : विरोधच नाही!

उत्तराखंडमध्ये ‘समान नागरी कायद्या’चा रोडमॅप कसा तयार झाला, असा प्रश्न यावेळी धामी यांना विचारण्यात आला, या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, उत्तराखंडमध्ये २०२२ मध्ये विधानसभेच्या निवडणुका झाल्या. आम्ही ही निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात लढलो. त्यावेळी उत्तराखंडमधील जनतेला आश्वासन दिले होते, की जर राज्यात आमची सत्ता पुन्हा आली, तर आम्ही ‘समान नागरी कायदा’ लागू करू. मतदारांनी आमच्यावर विश्वास ठेवला आणि भरभरून मतदान केले. उत्तराखंडमध्ये पुन्हा सत्ता आली. उत्तराखंडमध्ये दर पाच वर्षांनी सत्ता बदलते, असा जो समज होता, तो जनतेने खोटा ठरवला, आमची सत्ता आल्यानंतर आम्ही उत्तराखंडमध्ये ‘समान नागरिक कायदा’लागू केला, कोठेही गोंधळ नाही, गडबड नाही, दंगल मुळीच नाही, असे धामी यांनी अभिमानाने सांगितले.

### धामी ठरले उत्तरेकडील ‘हिंदुहृदयसम्राट’!

तुम्हाला आता ‘हिंदुहृदयसम्राट’ म्हणून ओळखले जाते? यावर प्रतिक्रिया देताना धामी यांनी नम्रपणे स्पष्ट केले की, मी भारतीय जनता पार्टीचा एक सामान्य कार्यकर्ता आहे. पक्ष मला जी जबाबदारी देईल, ती मी पार पाडतो. माझे नाव मोठे व्हावे, याकरता मी कधीही काम करत नाही. मी अनेक अनुभव घेतले आहेत. त्यामुळे मी सोपविलेले काम करत राहतो आणि ते पार पाडतो.

### नेमके काय म्हणाले पुष्करसिंह धामी ?

मा. मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपला भारत देश प्रगतीपथावर आहे. २०१४ पासून देशामध्ये अशी अनेक कामे झाली आहेत, ज्यांची गेल्या कित्येक वर्षांपासून देशवासीयांना प्रतिक्षा होती. ज्यामध्ये ३७० वे कलम रद्द करण्यात आले. अयोध्यामध्ये भव्य श्रीराम मंदिराचे निर्माण झाले. ‘तीन तलाक’ चा कायदा मंजूर झाला. भारत आज संपूर्ण जगाचे नेतृत्व करत आहे. देवभूमी उत्तराखंडमध्ये ‘समान नागरी कायदा’ लागू करण्यात आला आहे, अशी अनेक कामे गेल्या दहा वर्षांमध्ये झाली आहेत, ‘रोड मॅप’ तयार आहे. संपूर्ण देशात लवकरच ‘समान नागरी कायदा’ लागू होईल, अशी खात्री त्यांनी व्यक्त केली.

## रोल्स रॉईस या कारचे गुढ उलगडले

# कोरटकरची रोल्स रॉईस अखेर सापडली!

## पिंपरी चिंचवडचे तुषार कलाटे यांच्या फार्म हाऊसवर मिळाली कार

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रशांत कोरटकर याच्याकडे असलेल्या रोल्स रॉईस या कारचे गुढ उलगडले. तब्बल ८ कोटी रुपयांची ही कार पिंपरी चिंचवडचे बांधकाम व्यावसायिक तुषार कलाटे यांच्या फार्म हाऊसवर मिळाली. ती कार कोल्हापूर पोलिसांनी जप्त केली आहे. ही कार ठकबाज आरोपी महेश मोतेवार याच्या कंपनीच्या नावावर असून ती कार कलाटे याने बँकेच्या माध्यमातून विकत घेतल्याचा दावा करण्यात आला आहे.**



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी प्रशांत कोरटकरने रोल्स रॉईस कारसोबत काही फोटो आणि रिल्स सोशल मीडियावर पोस्ट केले होते.त्यामुळे ती कार कोरटकरची असल्याचे दिसत होते. एका रिल्समध्ये प्रशांत कोरटकर ही गाडी चालवताना देखील दिसला. एका महिन्यापासून या गाडीचा देखील शोध घेतला जात होता. शेवटी ही गाडी पिंपरी चिंचवडचे बांधकाम व्यावसायिक तुषार कलाटे यांच्या फार्म हाऊसवर मिळाली. या गाडीबद्दल एक वेगळाच दावा करण्यात आला. या गाडीचा मी मालक आहे असे तुषार कलाटे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटले.ही गाडी प्रशांत कोरटकरची नसून ही माझ्या मालकीची आहे. तीन ते चार महिन्यांपूर्वी माझ्या एका मित्रासोबत प्रशांत कोरटकरची भेट झाली. त्यावेळी त्याने ही गाडी चालवण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्यावेळीच त्याने हे रिल्स आणि फोटो काढले. तासभर गाडी चालवू देण्यासाठी त्याने मला विनंती केली. तुषार कलाटे यांनी म्हटले की, मी कोणत्याही चौकशीला जाण्यास तयार आहे. ही गाडी मी २०१६ मध्ये घेतली. याबद्दल माझी यापूर्वी सीआयडीकडून चौकशी झाली आहे. माझ्याकडे याबद्दलचे सर्व पुरावे आहेत, असेही कलाटे यांनी सांगितले. कोट्यवधीची फसवणूक करणारा महेश मोतेवार याच्या कंपनीच्या नावावर ही गाडी आहे, याबद्दल मला आताच माहिती कळालीये. मी ही गाडी बँकेकडून घेतलीये. सीआयडीमध्ये केस सुरू असल्याने ही गाडी माझ्या नावावर अजून झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. प्रशांत कोरटकर याच्याशी माझे कोणतेही संबंध नाहीत, असेही कलाटे म्हणाले. सध्या ती कार कोल्हापूर पोलिसांनी जप्त केली असून त्याबाबत सीबीआय आणि कोल्हापूर पोलिसांमध्ये पत्रव्यवहार झाल्याचे समोर आले आहे.प्रशांत कोरटकरने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त विधान केले होते. पोलिसांकडून प्रशांत कोरटकरचा पासपोर्ट देखील जप्त करण्यात आला. शेवटी पोलिसांनी कोरटकरला अटक केली. प्रशांत कोरटकर हा सध्या पोलिस कोठडीत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी प्रशांत कोरटकरने रोल्स रॉईस कारसोबत काही फोटो आणि रिल्स सोशल मीडियावर पोस्ट केले होते.त्यामुळे ती कार कोरटकरची असल्याचे दिसत होते. एका रिल्समध्ये प्रशांत कोरटकर ही गाडी चालवताना देखील दिसला. एका महिन्यापासून या गाडीचा देखील शोध घेतला जात होता. शेवटी ही गाडी पिंपरी चिंचवडचे बांधकाम व्यावसायिक तुषार कलाटे यांच्या फार्म हाऊसवर मिळाली.

### कोरटकरचा पासपोर्ट देखील जप्त

या गाडीबद्दल एक वेगळाच दावा करण्यात आला. या गाडीचा मी मालक आहे असे तुषार कलाटे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटले.ही गाडी प्रशांत कोरटकरची नसून ही माझ्या मालकीची आहे. तीन ते चार महिन्यांपूर्वी माझ्या एका मित्रासोबत प्रशांत कोरटकरची भेट झाली. त्यावेळी त्याने ही गाडी चालवण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्यावेळीच त्याने हे रिल्स आणि फोटो काढले.

## रेल्वे प्रवाशांना आठ दिवसात सुविधा द्या

# शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांकडून अधिकारी धारेवर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे रेल्वे स्थानकातील पायाभूत सुविधांच्या अभावाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने (उद्धव ठाकरे) आक्रमक भूमिका घेत रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. स्थानक परिसरात पायाभूत सुविधांची कमतरता असल्याची कबुली रेल्वे अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाला आठ दिवसांचा कालावधी देण्यात आला.**



दरम्यान, या कालावधीत प्रवाशांना सुविधा न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिवसेनेचे शहर प्रमुख संजय मोरे यांनी दिला.मध्ये रेल्वे विभागाच्या पुणे रेल्वे स्थानकातील फलटांवर प्रवाशांसाठी असलेल्या असुविधांबाबत दै. 'लोकसत्ता'ने गुरुवारी (२७ मार्च) 'रेल्वे स्थानकात फलटांवर गैरयोय' या शिर्षकाखाली वृत्त प्रकाशित केले होते.त्यानंतर शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून रेल्वे व्यवस्थापकांची भेट घेत तातडीने सुविधांची अंमलबजावणी करण्याचे निवेदन देत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. त्यामुळे रेल्वे स्थानकातून दिवसभरात लाखो प्रवासी प्रवास करत असतात. या प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासाची जबाबदारी रेल्वे प्रशासनाची असताना रेल्वे स्थानकाची परिस्थिती 'आओ जाओ घर तुम्हारा' अशी परिस्थिती झाली आहे. तत्कालीन व्यवस्थापक इंदू दुबे यांनी देखील रेल्वे स्थानक परिसरात १२० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र अद्याप कुठलीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे तातडीने सुरक्षितता निश्चित करून प्रवाशांना मुलभूत सुविधांबाबत अनेक मागण्यांबाबत रेल्वे प्रशासनाला निवेदन दिले आहे.रेल्वे स्थानकात असुविधा असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. याबाबत रेल्वे अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष स्थानकावर घेऊन जात वस्तुस्थिती दाखवून दिली. दरम्यान, रेल्वे परिसरातील सुरक्षितता आणि प्रवाशांसाठी असणाऱ्या सुविधांबाबतच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.

### प्रमुख मागण्या काय ?

आठ दिवसात सुविधांची अंमलबजावणी झाली नाही, तर तीव्र आंदोलन करण्यात येईल.प्रवाशांसाठी पुरेपूर आसन व्यवस्था करावी. उन्हाळा असल्याने मोफत पाण्याची व्यवस्था करावी. स्थानकात उत्तम दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे. अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी असलेले आणि ताडीवाला रस्त्यारील प्रवेशद्वारावर रेल्वे सुरक्षा पोलीस बल कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी.

## पिंपरी, रहाटणी, काळेवाडी मार्ग सुसाट

# पिंपरीची वाहतूक कोंडी फुटणार!

### पिंपरी डेअरी फार्म उड्डाणपुलाचे 55 टक्के काम पुर्ण

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने डेअरी फार्म येथे उड्डाणपूल बांधण्याचे काम सध्या प्रगतीपथावर असून आतापर्यंत या प्रकल्पाचे ५५ टक्के काम पूर्ण झाले आहे. या पूलाचे काम पूर्ण झाल्यानंतर पिंपरी व परिसरातील नागरिकांसाठी प्रवास अधिक सोयीस्कर होईल आणि वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्यासाठी मदत होणार आहे.**



पिंपरी डेअरी फार्म येथील उड्डाणपूल प्रकल्पाच्या कामाला मार्च २०२३ मध्ये कार्यादेश देण्यात आला होता. मात्र, या पुलाच्या बांधणीसाठी काही वृक्ष अडथळा ठरत असल्याने कामास विलंब झाला. महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीकडे एप्रिल २०२३ मध्ये वृक्ष तोड व पुनर्रोपणासाठी सादर केलेल्या प्रस्तावास ऑगस्ट २०२३ मध्ये मंजुरी मिळाली. पुलाच्या जागेत अडथळा ठरणारे १४२ वृक्ष काढण्यात आले तर ६४ वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात आले.मंजूर आराखड्यातील जागेतील काही वृक्ष संरक्षण विभागाच्या हद्दीत असल्याने त्यांचे मूल्यांकन करून संरक्षण विभागाची परवानगी घ्यावी लागली. वन विभागाने सप्टेंबर २०२३मध्ये मूल्यांकन पूर्ण केले आणि अखेर मार्च २०२४ मध्ये वृक्ष तोडीस परवानगी मिळाल्यानंतर मे २०२४ मध्ये १४२ वृक्ष काढण्यात आले. तसेच नोव्हेंबर २०२४ मध्ये संरक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ६४ वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात आले.

> शहरातील वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. डेअरी फार्म येथील उड्डाणपुल प्रकल्प पिंपरी चिंचवडसह संपूर्ण परिसराच्या वाहतुकीत लक्षणीय सुधारणा घडवून आणेल. प्रकल्पाच्या वेळेत पूर्ततेसाठी सर्व संबंधित यंत्रणा आणि प्रशासन प्रयत्नशील आहे. हा पुल सर्वांसाठी खुला झाल्यानंतर पिंपरीतील वाहतुकीची समस्या आणि परिसरातील नागरिकांचा प्रवास सोयीस्कर होण्यास मदत मिळणार आहे.
> –शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी

#### काम वेगाने सुरू करण्यात आले

हा पूल रेल्वे विभागाशी संलग्न असल्याने विविध मंजुरी प्रक्रियांमध्ये देखील विलंब झाला. रेल्वे विभागाच्या ओव्हर हेड इक्युपमेंट (ओएचई) व इतर संरचना बदलण्यासाठी आवश्यक मंजुरी व निधी हस्तांतरणाची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या कामासाठी रेल्वे विभागाने ७४.८९ लाख इतक्या आगाऊ रकमेची मागणी केली असून, त्याची प्रक्रिया पुर्ण करून रक्कम अदा केली आहे. सद्यस्थितीत रेल्वे विभागाच्या मंजुरीसाठी अंतिम टप्प्यात प्रक्रिया सुरू आहे. सध्या सर्व विभागांचा समन्वय साधून आता काम वेगाने सुरू करण्यात आले आहे.

#### वाहनचालकांना मिळणार दिलासा

पिंपरी डेअरी फार्म येथील लोहमार्गावर उभारण्यात येणाऱ्या पुलामुळे विना अडथळा वाहतुकीस चालना मिळणार आहे. यामुळे नोकरी, व्यवसाय किंवा अन्य कामांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांचा वेळ वाचणार आहे. हा पूल खुला झाल्यानंतर पिंपरीतील डेअरी फार्म, पिंपळे सौदागर, रहाटणी, काळेवाडी आणि पिंपरी गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. याशिवाय या प्रकल्पामुळे नागरिकांना सुविधा, सुरक्षितता आणि इंधन बचतीच्या दृष्टीने फायदा होणार असून पुणे मुंबई महामार्गावर तसेच तुकाराम नगर मेट्रो स्टेशनपर्यंत जलद आणि सहज पद्धतीने प्रवास करण्यासाठी मदत होणार आहे.

#### डेअरी फार्म उड्डाणपूल दृष्टिक्षेपात

- •पिंपरी व आजूबाजूच्या भागांतील नागरिकांना मुंबई-पुणे महामार्गाला सहज प्रवेश मिळेल.
- •रेल्वे फाटक बंद केल्यामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवासाचा विलंब कमी होईल.
- •संत तुकाराम नगर मेट्रो स्थानकात जाणे अधिक सोपे होईल.
- •इंधन आणि वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

---

## ‘मानवी साखळी 4.0’ द्वारे नदी विकास प्रकल्पाला विरोध

### दुर्गा टेकडी येथे पुनर्विकास योजनांचा निषेध करण्यासाठी अनोखा उपक्रम

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दुर्गा टेकडीवरील निसर्गसंपन्न जागांचे संरक्षण आणि पर्यावरणाच्या ऱ्हासास प्रतिबंध घालण्यासाठी जागरूक नागरिकांनी एकत्र येत ‘मानवी साखळी’ तयार केली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नदी विकास प्रकल्पासह (RFD) इतर पुनर्विकास योजनांचा निषेध करण्यासाठी हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. ‘रिव्हर कन्झर्वेशन २.०’ आणि ‘दुर्गा टेकडी मिशन’ यांच्या संयुक्त विद्यमाने या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले.**





या आंदोलनात २५० हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सकाळी व्यायामासाठी आलेल्या नागरिकांनीही या उपक्रमाला पाठिंबा दिला. त्यांनी पर्यावरण रक्षणाचे संदेश असलेले फलक हातात घेतले आणि समाजमाध्यमांवर छायाचित्रे शेअर करून जनजागृती केली. प्रस्तावित जलकुंभ आणि इतर विकासकामांमुळे दुर्गा टेकडीवरील निसर्गसंपत्ती धोक्यात येणार असल्याचा विरोध नागरिकांनी व्यक्त केला. परिसर घोषणांनी दुमदुमून गेला: “झाडतोड थांबवा!”, “नद्यांना आधी स्वच्छ करा!”, “नद्यांचे जतन, नाही तर रिकाम्या खुर्च्या!” अशा घोषणा देत नागरिकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी एकजूट दाखवली. पर्यावरणप्रेमींनी अहो जबाबदार नागरिकांनी निसर्गस्नेही विकासावर भर देण्याची गरज अधोरेखित केली. नद्यांवरील कृत्रिम बंधारे, जलतट सौंदर्यीकरण आणि जैवविविधतेला धोका पोहोचवणाऱ्या प्रकल्पांचा विरोध करण्यात आला. स्थानिक स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना आणि वैज्ञानिक तज्ज्ञांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला.

#### आंदोलनाचा विस्तार:

- ९ मार्च: चिंचवड, चाफेकर चौक
- १५ मार्च: बालेवाडी
- २३ मार्च: पिंपळे सौदागर
- २९ मार्च: दुर्गा टेकडी
- आगामी टप्पे: संपूर्ण शहरभर जनजागृती मोहिम

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचात आपण साक्षित्वाने वागावे

सत्य वस्तू ओळखणे हा परमार्थ, आणि असत्य वस्तूला सत्य मानून चालणे हा प्रपंच होय. आपल्याला वस्तू दिसते ती खरी असेलच असे नाही. पण ती मुळीच नाही असे मात्र नाही; ती काहीतरी आहे. एका दृष्टीने सत्य वस्तू अशी आहे की, प्रत्येकजण जे गुण त्या वस्तूला लावतो ते सर्व गुण तिच्या ठिकाणी आहेतच, शिवाय आणखी कितीतरी गुण तिच्या ठिकाणी आहेत; म्हणून ती निर्गुण आहे. दुसऱ्या दृष्टीने ती अशी आहे की, प्रत्येकजण जो गुण तिला लावतो तो कल्पनेनेच तिच्या ठिकाणी आहे असे आपण म्हणतो; म्हणून ती वस्तू गुणांच्या पलीकडे आहे. या अर्थानेसुद्धा ती निर्गुणच आहे. जशी आपल्या देहाची रचना, तशीच सर्व सृष्टीची रचना आहे. देहामधले पंचकोश सृष्टीमध्येदेखील आहेत. फरक एवढाच की, देहामध्ये ते मूर्त आहेत तर सृष्टीमध्ये ते अमूर्त स्वरूपात आहेत. भगवंताला एकट्याला करमेना म्हणून तो एकाचा अनेक झाला. त्याचा हा गुण माणसाने घेतला. आपण हौसेसाठी आपला व्याप वाढवितो. पण फरक हा की, भगवंताने व्याप वाढविला तरी त्यामध्ये तो साक्षित्वाने राहिला, आणि आपण मात्र व्यापामध्ये सापडलो. भगवंत सुखदु:खाच्या पलीकडे राहिला, पण आपण मात्र दु:खात राहिलो. व्यापाच्या म्हणजे परिस्थितीच्या बाहेर जो राहील त्याला दु:ख होणार नाही. खरे पाहिले तर व्यापातून वेगळेपणाने राहण्यासाठीच सर्व धडपड आहे. व्याप दु:खदायक न व्हावा असे वाटत असेल तर आपण साक्षित्वाने राहायला शिकले पाहिजे.

आपण जगामध्ये व्याप वाढवितो, तो आनंदासाठी वाढवितो. पण भगवंताच्या व्यतिरिक्त असणारा आनंद हा कारणावर अवलंबून असल्याने ती कारणे नाहीशी झाली की तो आनंद मावळतो. यासाठी तो आनंद अशाश्वत होय. म्हणून खरा आनंद कोठे मिळतो ते पाहावे.

जगणे म्हणजे शरीरात चैतन्य असणे होय. चैतन्य हे केवळ सच्चिदानंदात्मक आहे. म्हणून, जोपर्यंत आपण जिवंत आहोत तोपर्यंत स्वाभाविक आनंद असलाच पाहिजे. हा आनंद आपण भोगावा. ब्रह्मानंद आणि सुषुप्ती यांमध्ये फरक आहे. ब्रह्मानंद हा आहेपणाने आहे, तर सुषुप्तीचा आनंद हा नाहीपणाने आहे. आपल्याला झोप लागली की काय 'जाते' आणि जागे झालो की काय 'येते' हे नित्याचे असूनसुद्धा आपल्याला कळत नाही. भगवंताच्या इच्छेने सर्व होते आणि तोच सर्व करतो अशी भावना ठेवणे यासारखे समाधान नाही. कृतीमध्ये आनंद आहे, फळाच्या किंवा फळाच्या आशेत तो नाही. नामस्मरणरूपी कृती केली असता शाश्वत आनंदाचा सहज लाभ होईल

**बोधवचन:- भगवंताच्या स्मरणात कर्तव्य केले की जीवनात आनंद उत्पन्न होतो.**

# संविधानांचा खेळखंडोबा हा तर काँग्रेस हातखंडा!



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक



**नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्षांचे सरकार केंद्रात सत्तेवर आल्यापासून देशाचे संविधान धोक्यात असल्याची हाकाटी काँग्रेस आणि त्यांच्या मित्र पक्षांकडून पिटली जात आहे. यालाच 'फेक नरेटिव्ह' म्हणत असावेत ! नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यापासून देशाचे संविधान बदलणार असा ठपका ठेवण्यात आला होता, पण थोडेसे इतिहासात डोकावले तर या काँग्रेस पक्षानेच संविधानाची चिरफाड करण्याचा विडा पूर्वीपासून उचलला आहे आणि संविधानाशी छेडछाड करून खेळखंडोबा केला आहे, हे सुरुवातीलाच मान्य करायला हवे !**

### सगळे काही संविधानाच्या चौकटीत?

आठवा जरा, देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि काँग्रेसने हिंदूचा केलेला छळ..पण तो त्यांना न दुखावता ! यासाठी एक समर्पक गोष्ट आठवते. उंदीर रात्रीच्या अंधारात माणसाच्या पायाला चावतो. परंतु, सकाळी उठल्यावर आपल्याला कळते. त्यांचे कारण असे, की ज्या वेळी उंदीर तुमच्या पायाला हळूच चावतो, त्याच वेळी तो हवेची फुंकर मारतो. लक्षात आले ना, त्यामुळे तिथे थंडावा वाटतो. त्यामुळे उंदराने चावा घेतल्याचे कळत नाही. झोपेतून जागे झाल्यावर कळते व आग व्हायला लागते. नेमके तसेच हिंदूंच्या बाबतीत झाले आहे. उंदराच्या चाव्याचा तोच प्रकार काँग्रेसने हिंदूंच्या बाबतीत केला आहे हे प्रथम लक्षात घ्या ! संविधानात बदल करून किंवा नवीन कलमे आणून काँग्रेसने पडद्याआडून काय काय राजकारण केले त्याची उदाहरणे पाहू या.

### स्वातंत्र्यानंतर धर्म परिवर्तनाला मान्यता

सर्व प्रथम स्वातंत्र्यानंतर १९५० मध्ये आणले 'आर्टिकल २५'.. त्यामुळे धर्म परिवर्तनाला मान्यता देण्यात आली. जास्त धर्म परिवर्तन कुणाचे झाले, हे काही सांगायला नको. पण मुद्दाम लक्षात घ्या की तर नुसती सुरूवात होती. त्याचा सर्वात मोठा फटका हिंदू समाजाला बसला.

### धर्म शिक्षणाचा हक्क हिरावला..

१९५० मध्येच पंडित नेहरुंनी 'आर्टिकल २८' आणले. त्यामुळे हिंदूंचा धर्म शिक्षणाचा हक्क हिरावून घेतला गेला. त्याच वेळी नेहरूनी 'आर्टिकल ३०' आणले, ज्यामुळे अल्पसंख्यांकांना त्यांच्या धर्माचे शिक्षण दिले जाऊ शकते, हे संपूर्ण देशाच्या लक्षात आले. काँग्रेसचे यानंतरचे लक्ष होते, हिंदूंची धर्मस्थळे! त्यासाठी १९५१ मध्ये एच. आर. सी. ई. ॲक्ट म्हणजेच हिंदू रिलीजन अँड चॅरिटेबल ॲक्ट आणला गेला. त्यात त्यांनी कारण दिले की मोठ्या मंदिरात व्यवस्थापन बरोबर होत नाही. महत्त्वाचे म्हणजे हिंदू मंदिरात जे काही दान येत होते, त्याचा विनिमय हिंदूच्या भल्यासाठी व्हायचा, ते लक्षात आल्यानंतर त्यावर अंकुश म्हणून कायदा आणून सर्व मंदिराचे व्यवस्थापन आणि ताबा तसेच आर्थिक व्यवहारासह ताब्यात घेऊन त्याच्या पैशाचा मनमानी कारभार हातात घेतला गेला. त्यामुळे आपल्या देशातील चार लाख मंदिरांवर सरकारचे नियंत्रण आले, हे महत्त्वाचे आहे.

### हा कायदा हिंदू धार्मिक स्थळांना लागू!

आश्चर्याची गोष्ट म्हणजे हा कायदा फक्त आणि फक्त हिंदू धर्म स्थळांसाठीच होता. इतर धर्मांच्या धर्म स्थळाकरिता हा कायदा लागू नव्हता आणि नाही. थोडक्यात काय प्रत्येक वेळी हिंदूंना ग्राह्य धरले जाते, ही महत्त्वाची बाब !

### संविधानाची चिरफाड सुरूच..

इतिहास थोडासा पुढे सरकला तेव्हा १९५६ मध्ये 'हिंदू कोड बिल ' आणले. पण, बाकीच्या धर्मांच्या लोकांकरिता त्यांचा आपआपला कायदा लागू होतो. अल्पसंख्याकांच्या 'पर्सनल लॉ बोर्ड' ला हात लावला नाही, ही एक काँग्रेसची खासियत. एक धर्म संविधानाच्या नियमाने चालणार तर दुसरा धर्म आपल्या धर्माच्या कायद्याने, अशी देशाची अवस्था करून टाकली. इतिहासातून काही शिकले नाहीत, त्यामुळे आज पण ही मंडळी 'कॉमन सिव्हिल कोड' ला विरोध करतात, हे एव्हाना सगळ्यांच्या लक्षात आले आहे.

### बुडाखाली आरक्षणाची आग..

त्यानंतर काँग्रेसला उपरती झाली आणि त्यांनी देशाच्या बुडाखाली आरक्षणाची आग लावली. मुख्य गोष्ट लक्षात घ्या, काँग्रेसने आरक्षण आणून हिंदूंना एकमेकांपासून दूर करण्याचे काम केले आणि यातच हिंदूंचे फार मोठे नुकसान झाले. याद्वारे हिंदूंना एकमेकाविषयी द्वेष शिकविला. हा कायदा दहा वर्षांसाठी लागू करण्याचे ठरले. पण, त्याला बगल देऊन हा तसाचपुढेच चालू ठेवून हिंदूचे अपरिमित नुकसान केले गेले.

### सेक्युलर शब्दाची आपत्ती..

काळ पुढे सरकत गेला आणि १९७६ मध्ये इंदिरा गांधीच्या कार्यकाळात "सेक्युलर" हा शब्द संविधानात घुसविण्यात आला. हा काळ आणीबाणीचा होता. या सेक्युलर म्हणजे धर्मनिरपेक्ष शब्दासाठी ना कुणाची संमती घेण्यात आली, ना संसदेचे अधिवेशन बोलाविण्यात आले. याचाअर्थ हिंदू बहुसंख्य असून 'हिंदूराष्ट्र' म्हणता येत नाही, असा स्पष्ट इशारा देण्यात आला. इराण, इराक, पाकिस्तान, कतार, येमेन, सिरीया हे धार्मिक देश आहे. याचाच अर्थ हिंदूसाठी कोणताच देश नाही, या अनुषंगाने हिंदूंची पुन्हा गळचेपी झाली आणि त्यासाठी संविधान बदलले !

### हिंदूंची पूजा स्थळे आणि इतिहास रडारवर..

यानंतर हिंदूचे कायदेशीर अधिकार आणि इतिहास निशाण्यावर होते. त्यामुळे १९९१ मध्ये पूजा स्थळ कायदा बनविला. जो हिंदू विरोधी आहे. या कायद्याद्वारे हिंदू, शीख, जैन.व इतर हिंदू धर्म वासी यांच्या मंदिरांवर कब्जा केला असेल तर ते सोडविण्याकरिता लढाई पण करू शकत नाही. न्याय मागण्यांकरिता कायदेशीर अधिकारच ठेवला नाही. त्यामुळे लाखो मंदिरे आणि अधिकार हिंदूंना गमवावा लागला !

### ठराविक नागरिकांना स्पेशल दर्जा..

१९९२ मध्ये काँग्रेसने अल्पसंख्यांक आयोग अधिनियम आणला. (अल्प संख्यांक मायनॉरिटी कमिशन ॲक्ट) असे करून विशेष धर्माच्या लोकांना स्पेशल दर्जा दिला. त्यामुळे हिंदूंना डावलण्यात आले. अर्थातच, सरकारच्या प्रत्येक योजनेचा फायदा या विशेष अल्पसंख्याकांना मिळाला. असे करून काँग्रेसने सापाला पण मारले आणि काठी पण तुटू दिली नाही. याचाच अर्थ हिंदूंना आपापसात वाटले आणि धर्माचा आधार घेऊन विशेष नागरिकांना खुश केले.

### वक्फ बोर्ड कायदा आणून वाटोळे..

काँग्रेसने १९९५ मध्ये वक्फ बोर्ड कायदा आणला. या कायद्याद्वारे आणखी एक मोठे पाप या काँग्रेसवाल्यांनी केले. या कायद्याद्वारे वक्फ बोर्ड कुठल्याही संपत्तीवर आपला दावा सांगू शकतो. आज अशी स्थिती आहे, की या कायद्यामुळे वक्फ बोर्डला असीमित शक्ति दिली आहे. त्याविरुद्ध जर तुम्ही न्यायालयात गेलात, तरी न्यायालय पण काही करू शकत नाही. रेल्वे आणि संरक्षण मंत्रालयानंतर देशात सर्वात जास्त संपत्ती या वक्फ बोर्ड कडे आहे, यातच सगळे आले !

### काँग्रेसचा शेवटचा वार..

काँग्रेसकडून आता फक्त शेवटचा वार राहिला होता.. तो होता रामसेतू ॲफेडेविटचा.. सोनिया गांधीच्या काळात २००४ मध्ये मनमोहनसिंह सरकारने "रामसेतु ॲफेडेविट" बनवले आणि त्याद्वारे भगवान श्रीरामाच्या अस्तित्वालाच नकार दिला. श्रीरामाला काल्पनिक ठरवून हिंदूच्या आस्थेला काँग्रेसने आस पोहोचवली. २००४ मध्ये देशातील जनतेने काँग्रेसला निवडून दिले.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शेतकऱ्यांची दयनीय अवस्था करून ठेवलीत!

## आव्हाडांचा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर अजित पवारांना टोला

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना पीक कर्जे फेडण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या या सूचनेनंतर राजकीय वर्तुळातून त्यांच्यावर चांगलीच टीका केली जात आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुतीमधील भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचं आश्वासन दिलं होतं. मात्र, सरकार सत्तेत आल्यानंतर ही घोषणा हवेतच विरल्याचं पाहायला मिळत आहे. यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी या मुद्द्यावर अजित पवारांना लक्ष्य केले आहे.**



अजित पवार आज (२८ मार्च) एका कार्यक्रमात बोलताना शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार की नाही? याबाबत मोठं भाष्य केलं होतं. “मी सभागृहात उत्तर देताना देखील सांगितलं होतं की सगळी सोंगं करता येतात, पण पैशाचं सोंग करता येत नाही. आज तारीख आहे २८ मार्च, मी महाराष्ट्रातील जनतेला स्पष्ट सांगतो. ३१ मार्चच्या आत आपआपले पीक कर्जाचे पैसे भरा.” यावरून जितेंद्र आव्हाडांनी टीका केली आहे.बॉलिवूड चित्रपटातील एका गाण्याचा संदर्भ देत दादा क्या हुआ तेरा वादा? असा सवाल जितेंद्र आव्हाडांनी अजित पवार यांना विचारला आहे “शेतकऱ्यांची इतकी दयनीय अवस्था करून ठेवलीत...पाण्याविना पिकं करपून गेलीत, काही भागांत दुष्काळाची परिस्थिती आहे... लोकांना वीज बिल , शैक्षणिक खर्च , इतर वैयक्तिक कर्ज यामध्ये गुरफटून ठेवलं आहे... कुठून भरतील कर्जे आणि कुठून आणणार पैसा... ते सत्तेत थोडीच आहेत...तुम्हीच आश्वासने दिली होती...शेतकऱ्यांची कर्जे माफ करणार म्हणून... शेवटी जनता म्हणतेय, दादा क्या हुआ तेरा वादा... वो कसंम वो इरादा,” असे जितेंद्र आव्हाड म्हणाले आहेत. याबरोबर त्यांनी अजित पवारांच्या त्या विधानाबद्दलच्या बातमीचा फोटो देखील पोस्ट केला आहे. आव्हाडांप्रमाणेच काँग्रेस प्रदेश समितीचे अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी देखील अजित पवारांच्या कर्जमाफीबद्दलच्या विधानाचा समाचार घेतला आहे. त्यांनी याबद्दल सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर याबद्दल पोस्ट केली आहे.

“हे बोलताना ना यांची जीभ थरथरते ना यांना लाज शरम वाटते. जनतेने राक्षसी बहुमत देऊन सत्तेवर बसवलेले लोक आता राक्षसाप्रमाणे बोलू वागू लागले आहेत. विधानसभा निवडणुकीत कर्जमाफी देऊ असे आश्वासन देऊन महायुतीने राज्यातील शेतक-यांची मते घेतली आणि सत्तेवर येताच ३१ मार्च पूर्वी पीक कर्ज भरा, कर्जमाफी मिळणार नाही असे मुजोरपणे सांगत आहेत. लाडक्या बहिणींची फसवणूक अगोदरच केली आहे. विविध कारणे देऊन १० लाखांहून अधिक महिलांना अपात्र करून योजनेचा लाभ बंद केला आहे आणि २१०० रुपये मिळण्यासाठी ५ वर्ष वाट पहावी लागेल असे उद्दामपणे सांगत आहेत,” असे सपकाळ यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.अजित पवार आज (२८ मार्च) एका कार्यक्रमात बोलताना शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार की नाही? याबाबत मोठं भाष्य केलं होतं. “मी सभागृहात उत्तर देताना देखील सांगितलं होतं की सगळी सोंगं करता येतात, पण पैशाचं सोंग करता येत नाही. आज तारीख आहे २८ मार्च, मी महाराष्ट्रातील जनतेला स्पष्ट सांगतो. ३१ मार्चच्या आत आपआपले पीक कर्जाचे पैसे भरा.” यावरून जितेंद्र आव्हाडांनी टीका केली आहे.बॉलिवूड चित्रपटातील एका गाण्याचा संदर्भ देत दादा क्या हुआ तेरा वादा? असा सवाल जितेंद्र आव्हाडांनी अजित पवार यांना विचारला आहे “शेतकऱ्यांची इतकी दयनीय अवस्था करून ठेवलीत.

### तुम्हीच आश्वासने दिली होती

लोकांना वीज बिल , शैक्षणिक खर्च , इतर वैयक्तिक कर्ज यामध्ये गुरफटून ठेवलं आहे... कुठून भरतील कर्जे आणि कुठून आणणार पैसा... ते सत्तेत थोडीच आहेत...तुम्हीच आश्वासने दिली होती...शेतकऱ्यांची कर्जे माफ करणार म्हणून... शेवटी जनता म्हणतेय, दादा क्या हुआ तेरा वादा... वो कसंम वो इरादा,” असे जितेंद्र आव्हाड म्हणाले आहेत. याबरोबर त्यांनी अजित पवारांच्या त्या विधानाबद्दलच्या बातमीचा फोटो देखील पोस्ट केला आहे. आव्हाडांप्रमाणेच काँग्रेस प्रदेश समितीचे अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी देखील अजित पवारांच्या कर्जमाफीबद्दलच्या विधानाचा समाचार घेतला आहे.

# अहिल्यानगर : शेतकऱ्यांना ५० कोटींचा निधी

## जिल्ह्यातील 10 हजार शेतकऱ्यांना लवकरच निधीचे वितरण

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ठिबक, तुषार सिंचन, शेततळे प्लास्टिक अस्तरीकरण, कांदाचाळ, ट्रॅक्टर व औजारे, शेडनेट, पॉलीहाऊस या बाबीं करीता शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा निधीसाठी पाठपुरावा केल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ५० कोटी रुपयांचा निधी कृषि विभागास वितरीत केला असल्याची माहीती जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली.**



जिल्ह्यातील जवळपास १० हजार शेतकऱ्यांना ५० कोटी रुपये निधीचे वितरण येत्या आठवड्यात होईल असे सांगून विखे म्हणाले की, जिल्ह्यातील विविध तालुकास्तरीय दौऱ्यावर असताना तसेच जनता दरबार दरम्यान विविध तालुक्यातील शेतकरी बांधवांनी कृषि विभागातील प्रलंबित अनुदानाची मागणी सातत्याने केली होती. जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी शेडनेट, कांदाचाळ, ठिबक सिंचन यासाठी अनुदान मिळावे म्हणून प्रस्ताव सादर केले होते.मात्र शासनस्तरावर अनुदानाचा निधी जवळपास एक ते दिड वर्षापासून प्रलंबित होता.विधिमंडळाच्या अधिवेशना दरम्यान प्रलंबित अनुदान जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळावे म्हणून कृषी विभागाच्या अधिकाऱ्यां समवेत बैठक घेवून निधी तातडीने देण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्यानूसार राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत जिल्ह्याला ५० कोटी रुपये निधी प्राप्त करून घेण्यात यश आल्याचे विखे म्हणाले. वितरीत होणाऱ्या निधीमधून जिल्ह्यातील जवळपास १० हजार शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागणार आहे. कृषी विभागास वितरीत करण्यात आलेल्या निधीतील ९ हजार ११७ ठिबक व तुषार संच धारक शेतकऱ्यांना ३३ कोटी रुपये, शेततळे अस्तरीकरणातील ८४० शेतकऱ्यांना ५ कोटी ५० लाख रुपये, कांदाचाळ उभारणी करणाऱ्या ९६ शेतकऱ्यांना ९६ लाख रुपये, ट्रॅक्टर व औजारे अनुदानावर खरेदी करणाऱ्या २७१ शेतकऱ्यांना २ कोटी ९५ लाख रुपये, शेडनेट व पॉलीहाऊस उभारणी करणाऱ्या ४० शेतकऱ्यांना ४ कोटी ७८ लाख रुपये असा समावेश आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय सहकार मंत्री अमित शाहा यांनी संसदेत त्रिभूवन सहकार विद्यापीठ स्थापन करण्याच्या घेतलेल्या निर्णयाचे आपण स्वागत करतो, या विद्यापीठामुळे सहकार क्षेत्र विस्तारण्यासाठी पाठबळ मिळेल. विद्यापीठाच्या स्थापनेमुळे सहकारी संस्थाचा विस्तार, संशोधन आणि सहकार प्रशिक्षणाच्या संधी निर्माण होवून या चळवळीला व्यापक स्वरुप मिळेल.

### सहकारातून रोजगाराच्या संधी

त्रिभुवन सहकार विद्यापीठामुळे नव्या उद्यमशीलतेची सुरूवात व सहकारातून रोजगाराच्या संधी निर्माण होईल. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष सुरु असतानाच त्रिभूवन सहकार विद्यापीठाची स्थापना होणे ही सहकार चळवळीच्या दृष्टीने नवी सुरुवात आहे. सहकार चळवळीसाठी हे विद्यापीठ एक मुख्य मार्गदर्शनाचे केंद्र ठरेल.

# म्यानमारमध्ये पुन्हा भूकंप!

## एक हजाराहून अधिक जणांचा मृत्यू; 5.1 तीव्रतेचा भूकंप

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**म्यानमारला एका दिवसांपूर्वीच शक्तिशाली भूकंपाचे हादरे बसले आहेत, ज्यामध्ये एक हजाराहून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर पुन्हा एकदा शनिवारी दुसरा एक ५.१ तीव्रतेचा भूकंप झाला आहे. युनायटेड स्टेट जिओलॉजिकल सर्वे (USGS)ने याबद्दल माहिती दिली आहे.भूकंपाचे धक्के दुपारी २.५० वाजता म्यानमारची राजधानी नायपीडाव जवळ १० किमीच्या खोलीवर बसले अशी माहिती USGS ने दिली आहे. शनिवारी झालेल्या भूकंपामुळे किती नुकसान झाले तसेच यामध्ये जीवितहानी किती झाली याची माहिती अद्याप मिळालेली नाही.**



शुक्रवारी देखील याच ठिकाणी भूकंपाचे धक्के बसले होते. नायपीडाव शहरातील बहुतेक भागातील बंद पडलेली वीज, फोन आणि इंटरनेट सेवा खराब झालेले रस्ते दुरुस्त करण्याचे काम अधिकाऱ्यांकडून केले जात असतानाच पुन्हा भूकंपाचे हादरे बसले.म्यानमारला ७.७ रिश्टर स्केलच्या शक्तिशाली भूकंपाचे धक्के बसला आणि त्यानंतर अवघ्या ११ मिनिटांत दुसरा ६.४ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाचा धक्का बसला. ज्यामुळे देशभरातील इमारती, पूल, ऐतिहासिक वास्तू, रस्ते आणि इतर अनेक पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. प्रशासनाने जारी केलेल्या ताज्या अंदाजानुसार या भूकंपात किमान १,००२ लोकांचा मृत्यू झाला आहे आणि २,३०० हून अधिक जखमी झाले आहेत. मदतकार्य करणाऱ्या यंत्रणांकडून ढिगाऱ्यातून मृतदेह बाहेर काढले जात आहेत. यादरम्यान लष्कराच्या नेतृत्वाखालील सरकारने मृतांची संख्या आणखी वाढू शकते असे म्हटले आहे. तर USGC ने म्यानमारमध्ये मृतांची संख्या १० हजारपर्यंत जाऊ शकते असा अंदाज वर्तवला आहे. म्यानमारच्या शेजारील देश थायलंडमध्ये ही भूकंपाने इमारती हादरल्याचे पाहायला मिळाले. तसेच बँकॉकमध्ये एक बांधकाम सुरू असलेली गगनचुंबी इमारत देखील कोसळली.येथे किमान नऊ जणांचा मृत्यू झाला.शुक्रवारी म्यानमारमध्ये झालेल्या भूकंपाची कंपने शेजारील देशांमध्येही जाणवली. कोलकाता आणि इंफाळमध्ये सौम्य कंपने जाणवली होती. बांगलादेशमध्ये ढाका, चितगावसह विविध ठिकाणी धक्के जाणवले. चीनमध्ये युनान, सिचुआन प्रांतातही धक्के जाणवल्याचे नागरिकांनी सांगितले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्यानमार व थायलंडमधील विनाशकारी भूकंपाबद्दल चिंता व्यक्त केली होती. भारत दोन्ही देशांना सर्वतोपरी मदत करण्यास तयार असल्याचे सांगितले. मदतीसाठी अधिकाऱ्यांना सज्ज राहण्यास सांगितले असून परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाला दोन्ही देशांच्या सरकारांशी संपर्कात राहण्यास सांगितले आहे, असे मोदी म्हणाले. शुक्रवारी देखील याच ठिकाणी भूकंपाचे धक्के बसले होते. नायपीडाव शहरातील बहुतेक भागातील बंद पडलेली वीज, फोन आणि इंटरनेट सेवा खराब झालेले रस्ते दुरुस्त करण्याचे काम अधिकाऱ्यांकडून केले जात असतानाच पुन्हा भूकंपाचे हादरे बसले. म्यानमारला ७.७ रिश्टर स्केलच्या शक्तिशाली भूकंपाचे धक्के बसला आणि त्यानंतर

### फोन आणि इंटरनेट सेवा खराब

यादरम्यान लष्कराच्या नेतृत्वाखालील सरकारने मृतांची संख्या आणखी वाढू शकते असे म्हटले आहे. तर USGC ने म्यानमारमध्ये मृतांची संख्या १० हजारपर्यंत जाऊ शकते असा अंदाज वर्तवला आहे. म्यानमारच्या शेजारील देश थायलंडमध्ये ही भूकंपाने इमारती हादरल्याचे पाहायला मिळाले. तसेच बँकॉकमध्ये एक बांधकाम सुरू असलेली गगनचुंबी इमारत देखील कोसळली. येथे किमान नऊ जणांचा मृत्यू झाला. शुक्रवारी म्यानमारमध्ये झालेल्या भूकंपाची कंपने शेजारील देशांमध्येही जाणवली. कोलकाता आणि इंफाळमध्ये सौम्य कंपने जाणवली होती. बांगलादेशमध्ये ढाका, चितगावसह विविध ठिकाणी धक्के जाणवले. चीनमध्ये युनान, सिचुआन प्रांतातही धक्के जाणवल्याचे नागरिकांनी सांगितले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्यानमार व थायलंडमधील विनाशकारी भूकंपाबद्दल चिंता व्यक्त केली होती. भारत दोन्ही देशांना सर्वतोपरी मदत करण्यास तयार असल्याचे सांगितले.

# औरंगजेबाने चांगली कामंही केली!

## औरंगजेबाच्या कबरीवरून उसळलेल्या वादात धीरेंद्र शास्त्रींची उडी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**औरंगजेबाच्या कबरीवर प्रेम असणाऱ्यांनी स्वतःच्या घरात त्याची कबर बनवावी", असं वक्तव्य बागेश्वर धामचे विठाधीश्वर धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी केलं आहे. मुघल बादशाह औरंगजेब याच्या कबरीवरून चालू असलेल्या वादात आता धीरेंद्र शास्त्री यांनी देखील उडी घेतली आहे. ते म्हणाले, "ज्या औरंगजेबाने देश तोडण्याचं काम केलं त्याच्या आठवणी नष्ट केल्या पाहिजेत, त्याचं नामोनिशान मिटवलं पाहिजे."**




धीरेंद्र शास्त्री म्हणाले, "औरंगजेबाचं नामोनिशान मिटवून टाकलं पाहिजे. तुम्ही म्हणाल, औरंगजेबाने चांगली कामं देखील केली होती. मीही ते स्वीकारतो. परंतु, कोणी तुमच्या कानशीलात वाजवली आणि नंतर तुम्हाला पाणी देखील पाजलं तर तुम्ही नेमकं काय लक्षात ठेवाल? असंही नाही की त्याने (औरंगजेब) केवळ चांगलीच कामं केली होती. त्याने देश तोडण्याचं काम केलं होतं. त्यामुळे औरंगजेब हा महान असू शकत नाही. त्याची कबर तशीच ठेवण्याचं कारण नाही. त्यामुळे ज्या कोणाचं औरंगजेबाच्या कबरीवर प्रेम असेल त्याने त्याच्या घरातच त्याची कबर बांधून घ्यावी." टीव्ही ९ नेटवर्कच्या एका कार्यक्रमात धीरेंद्र शास्त्री बोलत होते.गेल्या काही दिवसांपासून औरंगजेब हा मुद्दा केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात वादाच्या केंद्रस्थानी आहे. औरंगजेबाची कबर हटवावी, या मागणीने आता चांगलाच जोर धरला आहे. अलीकडेच लक्ष्मण उत्तेकर दिग्दर्शिक 'छावा' हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांची पसंती मिळाली आहे. मात्र, औरंगजेबाने ज्या क्रूरतेने छत्रपती संभाजी महाराजांची हत्या केली होती, त्याचं चित्रणही या चित्रपटात करण्यात आलं आहे.हा चित्रपट पाहून लोकांचा औरंगजेबाबद्दलचा राग उफाळून आलेला असतानाच मानखुर्द-शिवाजीनगरचे (मुंबई) आमदार व समाजवादी पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांनी औरंगजेबावर स्तुतीसुमने उधळली होती. त्यामुळे लोकांचा राग आणखी तीव्र झाला. याचे विधानसभेतही पडसाद उमटले. पाठोपाठ बजरंग दलाने पत्रकार परिषद घेऊन औरंगजेबाची खुलताबाद (जिल्हा – छत्रपती संभाजीनगर) येथील कबर नष्ट करण्याची मागणी केली. त्यासाठी आंदोलनही केलं.

### चित्रपट पाहून राग उफाळून आला

पाठोपाठ औरंगजेब प्रकरणावरून नागपुरात दंगलही झाली. या सगळ्या घडामोडींमुळे औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा तापलेला असतानाच आता धीरेंद्र शास्त्री यांनी देखील या वादात उडी घेतली आहे.गेल्या काही दिवसांपासून औरंगजेब हा मुद्दा केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात वादाच्या केंद्रस्थानी आहे.

# भारतीय संस्कृतीत गुढीपाडवा सण का साजरा करतात?

भारतीय संस्कृतीत 'चैत्र शुद्ध प्रतिपदा' हा दिवस 'महापर्व' म्हणून साजरा करण्याची परंपरा आहे. महापर्वाच्या अर्थात नववर्षाच्या या पहिल्या दिवशी नवे संकल्प करून प्रगतीकडे वाटचाल सुरू करण्याचा हा दिवस आपण 'गुढीपाडवा' (GUDI PADWA 2025) म्हणून साजरा करतो. या दिवशी विजयाचे प्रतिक म्हणून घराच्या अंगणात गुढी उभारली जाते. ही गुढी का उभारली जाते? गुढीपाडवा चैत्र शुद्ध प्रतिपदेलाच का साजरा करतात? गुढी उभारण्यापूर्वी ब्रम्हदेवाची पूजा का केली जाते व गुढी उभारून झाल्यावर विष्णू देवाची पूजा करतात? सर्वकाही दडलंय या कथांमध्ये, तेव्हा या पौराणिक कथा सर्वांना माहित असायलाच हव्यात. शालिवाहन ह्या राजाने शालिवाहन शकास सुरुवात केली आणि या शकाची सुरुवात अर्थात आरंभ म्हणजेच गुढीपाडवा होय. शक सुरु करणारा पहिला महाराष्ट्रीयन राजा म्हणून आजही शालिवाहन राजाचे महत्त्व आहे. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले, त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला. मग या सैन्यांच्या मदतीने त्याने प्रभावी शत्रूंचा पराभव केला, अशी आख्यायिका आहे. या विजयाप्रित्यर्थ शालिवाहन शके सुरु होऊन नवीन वर्षाची सुरुवात होते. या दिवशी पंचाग वाचन करून आणि देवी सरस्वतीचे पूजन करून हिंदू नववर्षाचे स्वागत करण्याची प्रथा आहे.गुढीपाडवा साजरा करण्याचे एक कारण महाभारतामध्ये सुद्धा सापडते. यानुसार महाभारतातील आदिपर्वामध्ये उपरीचर नामक राजाने इंद्रामार्फत त्याला मिळालेली कळकाची



काठी इंद्राला नमन म्हणून जमिनीमध्ये रोवली आणि दुसऱ्या दिवशी त्या काठीची पूजा केली. हा दिवस होता नवीन वर्षाचा पहिला दिवस, म्हणून गुढीपाडवा साजरा करतात अशी आख्यायिका सुद्धा आहे.

ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली तो हाच पवित्र दिवस. ब्रम्हदेवाने विश्वनिर्मिती केली ती पाडव्याच्या दिवशीच आणि पुढे "सत्य-युगाची" सुरुवात झाली आणि म्हणूनच नुतन वर्षारंभ म्हणुन चैत्र शुक्ल प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा साजरा केला जातो. असे म्हणतात. या दिवशी विश्वातिल तेज तत्व आणि प्रजापती लहरी या मोठ्या प्रमाणात उत्सर्जीत होतात आणि गुढीच्या माध्यमाने आपण त्या अधिकाधीक संचित करायचा प्रयत्न करतो. भगवान विष्णूंनी मत्स्य रूप धारण करून शंकासुराचा वध केला, त्या मत्स्यरूपी विष्णूंचा जन्म चैत्र-शुद्ध प्रतिपदेचाच. शंखासुर नावाचा सागरापासून उत्पन्न झालेला आणि सदैव सागरातच वास्तव्य करणारा बलाढ्य राक्षस होता. या राक्षसाने जबरदस्तीने वेदहरण केले व तो सागराच्या तळाशी दडी मारून बसला. मग देवदेवता, ऋषीमुनींनी क्षीरसागरामध्ये योगनिद्रेत असलेल्या भगवान विष्णूंना जागृत केले आणि शंखासुरास धडा शिकवण्याकरिता सांगितले. भगवान विष्णूंनी मत्स्यरूप धारण करून शंखासुराचा ठावठिकाणा शोधून काढला व त्याचा शिरच्छेद करणार इतक्यात शंखासुर म्हणाला की, भगवान आपल्या हातून मज मरण यावे याकरिताच मी वेद पळविले. आपण माझा वध अवश्य करावा; परंतु माझी एक इच्छा अशी की माझे कलेवर तुम्ही नेहमी आपल्या डाव्या हातात धारण करावे तसेच माझ्या कलेवराच्या स्पर्शाच्या जलाने आपणांस स्नान केल्याखेरीज आपली पूजा पूर्ण होणार नाही असा मला वर द्यावा.” भगवान विष्णूंनी ‘तथास्तु’ म्हटले आणि शंखासुराचा वध केला. त्या दिवसापासून विष्णूने हातात शंखास धारण केले.

## गुढी पाडवा म्हणजे चैतन्यदायी बदल!

गुढी पाडवा हा वसंत ऋतुचा पहिला दिवस आणि शालिवाहन सवत्सराचा ही पहिला दिवस. शालिवाहन नावाच्या एका कुंभाराच्या मुलाने शकांचा पराभव करण्यासाठी मातीचे सैनिक तयार करून त्यांच्यात प्राण आणले व शकांचा पराभव केला अशी अख्यायिका प्रचलित आहे. याच शलिवाहन राजाच्या नावाने नवीन कालगणना सुरू झाली व हे शक सुरू झाले.प्रतिपदा म्हणजे ही महिन्याचा पहिला दिवस ब्रह्मदेवाने ही तिथी सर्वात श्रेष्ठ म्हणून निश्चित केली.या तिथीला युगादी तिथी ही म्हणतात. याच तिथीला गुढी पाडवा हा सण ही येतो. गुढी पाडवा हा हिंदूंचा नवं वर्षाचा पहिला दिवस. या दिवसापासून वसंत ऋतू सुरू होत असल्याने सृष्टीत नवीन चैतन्यदायी बदल घडतात.सृष्टीची सगळी मरगळ निघून जाते वसंत ऋतुचा आगमनाने झाडाची पानगळ थांबून नवीन हिरव्या,पोपटी रंगाची इवली इवली पान झाडावर डोलू लागतात. पक्षांची किलबिल वाढू लागते.

## गुढीपाडव्याची पौराणिक कथा!

गुढीपाडवा या सणापासून हिंदू नव वर्षाला सुरुवात होते. हिंदू पंचागानुसार, चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच वसंत ऋतुच्या पहिल्या दिवसाला गुढीपाडवा साजरा केला जातो. यंदा 9 एप्रिल 2024 ला महाराष्ट्रात गुढीपाडवा सण साजरा केला जाणार आहे. दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात आणि ढोल ताशांच्या जल्लोषात हिंदू नववर्षाचे स्वागत केले जाते. पारंपरिक मराठमोळी वेषभूषा, दागदागिने परिधान करत घरोघरी गुढी उभारत, गोडाधोडाचा स्वयंपाक करत नववर्षाचे मोठ्या उत्साहात स्वागत केले जाते. मुंबईसह राज्यभरात सार्वजनिक ठिकाणी मोठमोठ्या रांगोळ्या देखावे आणि शोभायात्रा काढून मराठी नववर्षाचे स्वागत करत आनंद व्यक्त केला जातो.यंदा 9 एप्रिल 2024 रोजी गुढीपाडवा हा सण साजरा केला जाईल. चैत्र महिन्याची प्रतिपदा तिथी 8 एप्रिल 2024 रोजी रात्री 11:50 पासून सुरु होईल आणि 9 एप्रिल 2024 रोजी रात्री 8:30 वाजता समाप्त होईल. तसेच गुढीच्या पूजेसाठी सकाळी 6:02 ते 10:16 पर्यंतची वेळ शुभ असेल.गुढीपाडव्या संबंधित असलेल्या पौराणिक कथेनुसार, राजा बळी त्रेतायुगात दक्षिण भारतावर राज्य करत होता. जेव्हा प्रभू राम सीतेला रावणापासून मुक्त करण्यासाठी लंकेकडे जात होते. त्यानंतर दक्षिणेत त्यांची भेट बळीचा भाऊ सुग्रीवाशी झाली. सुग्रीवाने भगवान रामाला बळीच्या कुशासन आणि दहशतीबद्दल सर्व गोष्टी सांगितल्या. त्यानंतर प्रभू रामाने बळीचा वध करून सुग्रीवाला त्याच्या दहशतीतून मुक्त केले. असे म्हणतात की, ज्या दिवशी प्रभू रामाने बळीचा वध केला, तो दिवस चैत्र शुक्ल पक्षातील प्रतिपदा होता. म्हणूनच दरवर्षी हा दिवस दक्षिणेला गुढीपाडवा म्हणून साजरा केला जातो आणि विजयाची पताका फडकवली जाते.गुढीपाडवा या सणापासून हिंदू नव वर्षाला सुरुवात होते. हिंदू पंचागानुसार, चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच वसंत ऋतुच्या पहिल्या दिवसाला गुढीपाडवा साजरा केला जातो.



## पाडव्याच्या दिवशी काय करावे काय करु नये?

हिंदू धर्मात गुढीपाडव्याला विशेष महत्त्व आहे. गुढीपाडवा हा सण दरवर्षी चैत्र महिन्यातील शुक्ल प्रतिपदेला साजरा केला जातो. या सणाची महाराष्ट्रात मोठी धामधूम पाहायला मिळते. या दिवशी लोक घराची स्वच्छता करतात. नवीन पारंपरिक कपडे घाला. पारंपारिक अन्न शिजवा आणि खा. घराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर रांगोळी काढा. महाराष्ट्रात हा सण नवीन वर्षाच्या सुरुवातीचे प्रतीक म्हणून साजरा केला जातो.गुढीपाडव्याला भगवान विष्णूसह ब्रह्मदेवाची



पूजा करण्याची परंपरा आहे. शास्त्रानुसार जो कोणी या दिवशी देवाची पूजा करतो आणि काही नियमांचे पालन करतो, त्याला वर्षभर देवाकडून सुख आणि उत्तम आरोग्याचा आशीर्वाद मिळतो. एवढेच नाही, तर देवाची यथासांग पूजा केल्याने सर्व मनोकामना पूर्ण होतात. हिंदू धर्मग्रंथांमध्ये या दिवशी काही खास गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत असे सांगितले आहे. जाणून घ्या गुढीपाडव्याच्या दिवशी काय करावे आणि काय करू नये.हिंदू पंचांगानुसार, चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथी 29 मार्च रोजी दुपारी 4.27 वाजता सुरू होत आहे. ही तारीख दुसऱ्या दिवशी 30 मार्च रोजी दुपारी 12:49 वाजता संपेल. उदयतिथी हिंदू धर्मात वैध आहे. त्यामुळे 30 मार्च रोजी गुढीपाडवा हा सण साजरा केला जाणार आहे. या दिवसापासून चैत्र नवरात्रीलाही सुरुवात होत आहे.

# मुंबई इंडियन्सचा सलग दुसरा पराभव!

## गुजरात टायटन्स घरच्या मैदानावर मुंबईसमोर अपराजित

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**गुजरात टायटन्स संघाने मुंबई इंडियन्सचा ३६ धावांनी पराभव करत आयपीएल २०२५ मधील आपला पहिला विजय नोंदवला. या सामन्यात मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. यासह गुजरात टायटन्सने साई सुदर्शनच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर २० षटकांत १९६ धावा केल्या. या सामन्यात मुंबई इंडियन्सच्या प्लेईंग इलेव्हनमध्ये मोठे बदल पाहायला मिळाले. मुंबई इंडियन्सच्या फलंदाजी फळीत एकापेक्षा एक उत्कृष्ट फलंदाज असले तरी मुंबई संघाला मात्र विजय मिळवता आलेला नाही.**



गुजरात टायटन्सचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीला उतरला होता. त्यांनी प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १९६ धावा केल्या होत्या. तर प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्सचा संघ ६ बाद १६० धावा करू शकला. गुजरातच्या सर्वच गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत मुंबईच्या धावांना ब्रेक लावला आणि विकेट्सही घेतले. गुजरातने दिलेल्या १९७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईची सुरूवात चांगली झाली नाही. रोहित शर्माने पहिल्याच षटकात दोन चौकार लगावले पण तो सिराजच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला. यानंतर सिराजने रायन रिकल्टनला ६ धावांवर त्रिफळचीत केलं. यानंतर सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्माने संघाचा डाव सावरला पण या खेळपट्टीवर खेळताना ते संघाला विजयापर्यंत नेऊ शकले नाहीत.तिलक वर्मा मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात ३६ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकारासह ३९ धावा करत बाद झाला. तर सूर्या २८ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ४८ धावा करत झेलबाद झाला. रॉबिन मिन्जने पुन्हा निराश करत ३ धावा करत बाद झाला. हार्दिकही मोठी खेळी करू शकला नाही. तर नमन धीर आणि मिचेल सँटनर यांनी १८-१८ धावांची खेळी करत धावांचा पल्ला कमी केला. प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या गुजरात संघाने चांगली सुरूवात केली आणि पॉवरप्लेमध्ये एकही विकेट न गमावता चांगली धावसंख्या उभारली. साई सुदर्शनने ४१ चेंडूत ४ चौकार आणि २ षटकारांसह ६३ धावा केल्या. तर गिल २७ चेंडूत ४ चौकार आणि एका षटकारासह ३८ धावा केल्या. बटलरने २४ चेंडूत ५ चौकार आणि एका षटकारासह ३९ धावा केल्या. तर शाहरूख खान ९ धावा करत बाद झाला. शरफन रूदरफोर्डने १८ धावांचे योगदान दिले.

### गुजरात संघाने चांगली सुरुवात केली

मुंबई इंडियन्सकडून हार्दिक पंड्याने २ विकेट तर दीपक चहर, मुजीब उर रहमान, बोल्ट आणि सत्यनारायण राजू यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.गुजरातच्या सर्वच गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत मुंबईच्या धावांना ब्रेक लावला आणि विकेट्सही घेतले. गुजरातने दिलेल्या १९७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईची सुरूवात चांगली झाली नाही. रोहित शर्माने पहिल्याच षटकात दोन चौकार लगावले पण तो सिराजच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला. यानंतर सिराजने रायन रिकल्टनला ६ धावांवर त्रिफळचीत केलं. यानंतर सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्माने संघाचा डाव सावरला पण या खेळपट्टीवर खेळताना ते संघाला विजयापर्यंत नेऊ शकले नाहीत.तिलक वर्मा मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात ३६ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकारासह ३९ धावा करत बाद झाला.

# अरे विघ्नेश पुथूर आहे तरी कुठे?

## मुंबई इंडियन्सची प्लेईंग इलेव्हन पाहून चाहते वैतागले

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मुंबई इंडियन्सचा संघ आयपीएल २०२५ मधील दुसरा सामना गुजरात टायटन्सविरूद्ध खेळत आहे. या सामन्यातील मुंबई इंडियन्सची प्लेईंग इलेव्हन पाहून चाहते प्रश्न विचारू लागले आहेत. मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात दुसऱ्या सामन्यासाठी कर्णधार हार्दिक पंड्याचं पुनरागमन झालं आहे. यामुळे संघात मोठे बदल झाले आहेत. पण लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे गेल्या सामन्यातील हिरो विघ्नेश पुथूरला संघाबाहेर केलं आहे.**





मुंबई इंडियन्स दुसरा सामना गुजरात टायटन्सविरूद्ध खेळत आहे. नरेंद्र मोदी स्टेडियमवर हा मोसमातील ९वा सामना खेळवला जात आहे. या स्पर्धेत दोन्ही संघांची सुरुवात खराब झाली आणि त्यांना पहिला सामना गमवावा लागला. यामुळे खाते उघडण्याच्या इराद्याने दोन्ही संघ मैदानात उतरले आहेत. बंदीमुळे पहिला सामना खेळू न शकलेला कर्णधार आणि स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या या सामन्यात पुनरागमन करणे ही मुंबईसाठी दिलासादायक बाब होती.

हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकली पण मुंबई इंडियन्सच्या प्लेइंग इलेव्हनच्या निवडीचा निर्णय सर्वांनासाठीच धक्कादायक होता. मुंबईने या सामन्यासाठी प्लेइंग इलेव्हनमध्ये दोन बदल केले, ज्यामध्ये विल जॅक्सच्या जागी हार्दिकने पुनरागमन केले परंतु डावखुरा फिरकी गोलंदाज विघ्नेश पुथूरलाही वगळण्यात आले. त्याच्या जागी अफगाणिस्तानचा फिरकी गोलंदाज मुजीब उर रहमानला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जॅक्सला पर्यायी खेळाडूंमध्ये स्थान मिळाले पण विघ्नेश पुथूरचा यामध्येही समावेश करण्यात आलेला नाही.विघ्नेशला गुजरातविरूद्ध सामन्यातून का बाहेर करण्यात आले याचे कारण देण्यात आले नाही. २४ वर्षीय फिरकीपटू विघ्नेशने चेन्नईविरुद्धच्या मोसमातील पहिल्याच सामन्यात आयपीएलमध्ये पदार्पण केले. या सामन्यापूर्वी एकही वरिष्ठ स्तरावरील सामना न खेळलेल्या या डावखुऱ्या फिरकीपटूने पहिल्याच षटकात विकेट घेतली आणि नंतरच्या दोन षटकांतही १-१ विकेट घेतली.

### हार्दिक पंड्याचं पुनरागमन

पदार्पणाच्या सामन्यातच ३ विकेट घेत त्याने त्या सामन्यात मुंबईचा सर्वोत्तम खेळाडू असल्याचे सिद्ध केले. पण त्याला संघाबाहेर करण्याचा निर्णय पाहून सर्वांनाच धक्का बसला.मुंबई इंडियन्सचा संघ आयपीएल २०२५ मधील दुसरा सामना गुजरात टायटन्सविरूद्ध खेळत आहे. या सामन्यातील मुंबई इंडियन्सची प्लेईंग इलेव्हन पाहून चाहते प्रश्न विचारू लागले आहेत. मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात दुसऱ्या सामन्यासाठी कर्णधार हार्दिक पंड्याचं पुनरागमन झालं आहे. यामुळे संघात मोठे बदल झाले आहेत. पण लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे गेल्या सामन्यातील हिरो विघ्नेश पुथूरला संघाबाहेर केलं आहे. मुंबई इंडियन्स दुसरा सामना गुजरात टायटन्सविरूद्ध खेळत आहे. नरेंद्र मोदी स्टेडियमवर हा मोसमातील ९वा सामना खेळवला जात आहे. या स्पर्धेत दोन्ही संघांची सुरुवात खराब झाली आणि त्यांना पहिला सामना गमवावा लागला. यामुळे खाते उघडण्याच्या इराद्याने दोन्ही संघ मैदानात उतरले आहेत. बंदीमुळे पहिला सामना खेळू न शकलेला कर्णधार आणि स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या या सामन्यात पुनरागमन करणे ही मुंबईसाठी दिलासादायक बाब होती. हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकली पण मुंबई इंडियन्सच्या प्लेइंग इलेव्हनच्या निवडीचा निर्णय सर्वांनासाठीच धक्कादायक होता.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
। दि. 30 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## जागतिक पातळीवर कृषी क्षेत्राच्या विकासात

# भारताची प्रगती - शैलेंद्र देवळाणकर धारवाडकर

### शिक्षण विश्व: पुणे बिझनेस स्कूलच्या ‘ॲग्रोवाईस – 25’ चर्चासत्राचे आयोजन

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

जागतिक पातळीवरील विकासाचा रेटा पाहता भारताला या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कृषी क्षेत्राच्या विकासावर भर द्यावा लागेल; तरच भारत मोठी प्रगती करू शकेल. आर्थिक उदारीकरणामुळे जागतिक पातळीवरील मोठमोठ्या संस्था आपले बस्तान बसवत आहे. आपण स्वतःभोवती सुरक्षा कवच तयार करून भारतातील कृषी, उद्योग व्यवसाय यासाठी सुरक्षित व्यापार करू शकणार नाही. आपल्याला जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील. भारत सरकार या दृष्टीने वाटचाल करताना दिसत आहे. शेती विषयक शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच कृषी उद्योजकांनी जागतिक स्पर्धेचा विचार करून पुढील वाटचाल ठरवली पाहिजे. कृषी क्षेत्राचा मोठा वाटा भारताच्या विकासामध्ये यापुढील काळात राहील, असे स्पष्ट मत महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभागाचे शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी व्यक्त केले.




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचलित पुणे बिझनेस स्कूलच्या (पीबीएस) वतीने ‘ॲग्रीवाईज २०२५’ या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन शनिवारी (२९ मार्च) निगडी येथील संस्थेच्या सभागृहात केले होते. यावेळी दुबई येथील देवा इलेक्ट्रिक सिटी अँड वॉटर ॲथोरिटीचे व्यवस्थापक सोमनाथ पाटील, महाराष्ट्र इकॉनोमिक डेव्हलपमेंट कौन्सिलचे उपाध्यक्ष सचिन इटकर, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीबीएसचे संचालक डॉ. गणेश राव, अधिष्ठाता डॉ. मीनाक्षी त्यागी आदी उपस्थित होते. यावेळी कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ, विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, प्रगतशील शेतकरी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



यावेळी पीबीएसच्या वतीने ॲग्री वाईज या मासिकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच ‘कृषी उद्योग भूषण गौरव पुरस्कार २५’ चे वितरण करण्यात आले. द्राक्ष उत्पादक संघ पुणेचे जितेंद्र बिडवई, सावित्री फार्मचे अजित घोलप, गोल्डन एरा इको सर्व्हिसेसच्या प्रियंका पाटील, फ्रेटली फार्मचे विश्वजीत मोरे, शिवार फाऊंडेशनचे विनायक हेगावे, कृषीकाव्य ॲग्रो व्हेरमीकंपोस्टच्या कविता ढोबळे आदींचा कृषी भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

दुपारच्या सत्रात कोरोमंडल इंटरनॅशनलचे जितेंद्र कोळपे ॲग्री सेल्सिचे मुख्य कार्यकारी अधिकारी वामसी कृष्णा बायोटेक चे संस्थापक संचालक संजय वायाळ सुशील जाधव तुषार देवकर द अरविंद कडूस लोका अजय रेड्डी यांनी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. सूत्रसंचालन आणि आभार डॉ. मीनाक्षी त्यागी यांनी मानले. प्रास्ताविक डॉ. गणेश राव यांनी केले.

### जागतिक मंदीतही भारताची अर्थव्यवस्था सक्षम

ज्या देशांची अर्थव्यवस्था औद्योगिक उत्पादन, सेवा क्षेत्र आदींवर अवलंबून आहे; त्या अर्थव्यवस्थेस मंदीच्या काळात फटका बसत असल्याचे दिसून येते. परंतु कृषी क्षेत्रावर आधारित ज्या देशांची अर्थव्यवस्था आहे ती जागतिक मंदीच्या काळातही टिकून राहत योग्य प्रकारे विकसित होत आहे; असे पहायला मिळते. याचे उत्तम उदाहरण भारताचे आहे. जागतिक स्पर्धा पाहता आपल्या शेती आणि शेतकरी पूरक उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ झाली पाहिजे. म्हणजे भारताची अर्थव्यवस्था वेगाने विकसित होईल, असे सचिन इटकर यांनी सांगितले.

### अन्नधान्याची गरज ओळखा

भारतामध्ये शेती खालील लागवडीचे क्षेत्र मोठे आहे. आज विशिष्ट देशांची अन्नधान्याची गरज ओळखून त्याप्रमाणे शेती उत्पादन आणि शेतीपूरक उद्योग उभारणी केल्यास; भारतातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध होतील आणि देशाच्या विकासाल चालना मिळेल, असे सोमनाथ पाटील म्हणाले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.




"भारती शेअर मार्केट क्लासेस "उदया पासून ठाणे (मुंबई ) येथे सुरू होत आहे.
उदघाटन समारंभासाठी आपण यावं आणि मुंबई मधील आपल्या जवळच्या लोकांना नक्की पाठवा.


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा
₹ १३००/-
'C++' भाषा
₹ १३००/-
बेसिक जावा
₹ १३००/-
स्क्रॅच अॅनिमेशन
₹ १३००/-
बेसिक टॅली
₹ १५००/-
एम.एस. ऑफिस
₹ १५००/-
कोरल ड्रॉ
₹ ११००/-
Adobe AB फोटोशॉप
₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

**PRIYADARSHANI**
SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS


Contact Us Now

**86687 55826**

**98232 31705**

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




PCU
PCET's
Pimpri
Chinchwad
University, Pune
Learn | Grow | Achieve
Pimpri Chinchwad University,
we celebrate knowledge, culture, & new beginnings.
This Gudi Padwa, may your year be as bright as your dreams & as strong as your aspirations.
HAPPY
Gudi
PADWA
Let's raise the Gudi for success, progress, and purpose!
Wishing all students, faculty, and families a very Happy Gudi Padwa!
connect us :
www.PCU.edu.in